ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २८ | पुणें, बुधवार तारीख १९ डिसेंबर, १९६२ | अंक २२

## विविध माहिती

**अशोक हॉटेल नफ्यांत**—१९६१-६२ सालांत दिल्ली येथील अशोक हॉटेल लि. ह्या कंपनीला १३,१९,००० रुपये नफा झाला. पूर्वीच्या वर्षांत झालेला तोटा, घसारा, कर्जावरील व्याज, इत्यादींची तरतूद करून हा नफा झालेला आहे. कंपनीनें आपला धंदा चालू केल्यानंतर प्रथमच भागीदारांत नफ्याची वाँटणी केली आहे. अग्रहक्क असलेल्या भागांवर ७·१५ टक्के नफा जाहीर करण्यांत आला आहे.

**प्रवाशांवरील करांत वाढ**—उत्तर-प्रदेश सरकारनें राज्यांतील सरकारी मालकीच्या मोटारगाड्यांतून प्रवास करणाऱ्या उतारूंपासून घेण्यांत येणाऱ्या करांत वाढ करण्याचें ठरविलें आहे. सध्यां उतारूंकडून घेण्यांत येणाऱ्या आकारावर ५ टक्के कर घेण्यांत येतो. ता. १ डिसेंबर १९६२ पासून तो १० टक्के करण्यांत आला आहे.

**कोर्ट अधिक वेळ बसणार**—चीनच्या आक्रमणामुळें उत्पन्न झालेल्या आणीबाणीच्या परिस्थितींत रोज एक तास अधिक काम करण्याचा निर्णय अलाहाबाद हायकोर्टाच्या एका जज्जानें घेतला आहे. भारतामधील कोर्टांतून ४७,९६३ कज्जे अनिर्णित राहिले असल्यानें जज्जांनीं अधिक वेळ काम करावें आणि वर्षांतून १५च दिवस सुट्टी घ्यावी अशी सूचना त्यांनीं केली आहे.

**चीनचे प्रचारतंत्र**—भारत चीन युद्धांत कैद करण्यांत आलेल्या कांहीं हिंदी जवानांना बहुधा ल्हासामध्यें नेण्यांत आलें असावें. पकडलेल्या कैद्यांपैकीं दोन अधिकाऱ्यांच्याकडून त्यांच्या कुटुंबियांना पत्रें आलीं आहेत. एका अधिकाऱ्याला रेडिओवरून आपली खुशाली कळविण्याची परवानगीहि देण्यांत आली होती. चीननें उघडलेल्या प्रचार आघाडीचाच हा एक भाग आहे.

**गोव्यामधील संकल्पित विद्युत्-केंद्र**—गोव्यामध्यें कॅसलरॉक रेल्वेस्टेशनपासून कांहीं अंतरावर दूधसागर ह्या नांवानें ओळखला जाणारा एक धबधबा आहे. ह्या धबधब्याच्या जलप्रपाताचा उपयोग करून वीज निर्माण करण्याची शक्यता अजमावण्यासाठी गोव्याच्या गव्हर्नरांनीं २·५९ लाख रुपये मंजूर केले आहेत. संकल्पित विद्युत्केंद्र २०,००० किलोवॅट वीज उत्पन्न करूं शकेल असा अंदाज आहे.

**मोत्यांचा शिंपल्यांचा धंदा**—तुतिकोरीन जवळच्या समुद्रांत मोत्यांचे शिंपले समुद्राच्या तळापासून काढण्याचा धंदा चालतो. गेलीं ६ वर्षें हा धंदा ओळीनें चालविला गेला व १० लाख रुपयांचे मोती दरसाल सरासरीनें मिळविण्यांत आले. चालू सालीं चांचणी केली असतां मोती मिळण्याची शक्यता दिसत असल्यानें मोत्यांची मच्छीमारी बंद राहाणार आहे.

**स्वामी विवेकानंदांचा पुतळा**—स्वामी विवेकानंदांच्या १०० व्या जन्मतिथीच्या निमित्तानें कन्याकुमारी येथें त्यांचा २२ फूट उंचीचा एक ब्रॉंझचा पुतळा उभारण्यांत येणार आहे. कन्याकुमारी भुशिरापासून २०० यार्डांवर असलेल्या खडकावर तो स्थापन करण्यांत येईल.

**ब्रह्मदेशाच्या तांदुळाची आयात**—ब्रह्मदेशाकडून भारत तांदूळ आयात करण्याचा विचार करीत आहे. ब्रह्मदेश भारताला मोठ्या प्रमाणावर तांदूळ देण्यास तयार आहे. परंतु, परदेशीय चलनाच्या टंचाईमुळें भारत तांदुळापेक्षा गहूं आयात करण्यास अधिक राजी आहे.

**जर्मन उद्योगपतीचा दौरा**—जर्मनींतील जगप्रसिद्ध उद्योगपति आल्फ्रेड क्रुप भारताच्या दौऱ्यावर आले आहेत. त्यांचा दौरा ९ दिवसांचा आहे. भारतांत क्रुप औद्योगिक संघटनेच्या मदतीनें जे कारखाने काढण्यांत आले आहेत, त्यांच्या विस्तारासाठी व त्यांच्यांत उत्पादनाची विविधता आणण्यासाठी काय करतां येईल ह्याची तपासणी ते करणार आहेत. तपासणी करतांना भारताच्या संरक्षणविषयक गरजा नजरेसमोर ठेवण्यांत येतील अशी अपेक्षा आहे.

**पाकिस्तानांतील सोन्याचा भाव घसरला**—गेल्या महिन्यांत पाकिस्तानमधील सोन्याची किंमत तोळ्यामागें १४ रुपयांनीं घसरली आहे. भारतावर चीननें केलेल्या आक्रमणानंतर सोन्याच्या भावाला लागलेल्या घसरगुंडीचा हा परिणाम आहे. गेल्या महिन्याच्या प्रारंभीं कराचींत सोन्याची किंमत तोळ्याला १३२ रुपये होती. ती महिनाअखेर ११८ रुपयांपर्यंत खालीं आली.

**रशिआंतील लांचलुचपत**—रशिआचे पंतप्रधान मि. क्रुश्चॉव ह्यांनीं रशिअन कम्युनिस्ट पक्षाला केलेल्या अहवालांत रशिअन सरकारच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांत फार मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार व लांचलुचपत बोकाळल्याची माहिती दिली आहे. १९६२ च्या पहिल्या सहा महिन्यांत रशिआंतील कोर्टांनीं ५·६ कोटी रुबलच्या अफरातफरींचे खटले चालविले. ही वस्तुस्थिति त्यांनीं आपल्या विधानाच्या पुष्ट्यर्थ जाहीर केली.

**'थॅलिडोमाइड' औषधाचा परिणाम नाहीं**—गर्भवती स्त्रियांनीं 'थॅलिडोमाइड' औषध घेतल्यानें विद्रूप मुलें जन्माला येतात. म्हणून अशा मुलांना जाणूनबुजून कालवश केल्याचे प्रकार युरोपांत होत आहेत. तथापि, औषध न घेतल्यानंतरहि जीं मुलें वाचतात तीं इतर बाबतींत सामान्य मुलांसारखींच वाढतात असें एका जर्मन डॉक्टरचें म्हणणें आहे. म्हणून अशा मुलांना मारणें हा गुन्हा असल्याचें मत त्यानें व्यक्त केलें आहे.

## चीन-जपानच्या दरम्यान ऐनजिनसी व्यापार सुरू होण्याची शक्यता

### भारताच्या निर्गतीवर परिणाम ?

जपानमध्यें सध्यां लिबरल-डेमोक्रॅटिक पक्षाचें सरकार सत्तारूढ आहे. ह्या पक्षाचे एक ज्येष्ठ सदस्य मि. केंझो मत्सुमारा आणि चीनचे पुढारी ह्यांच्या दरम्यान व्यापारी संबंध प्रस्थापित करण्याविषयीं पेकिंगमध्यें नुकतीच बोलणीं झालीं. ह्या बोलण्याची फलश्रुति म्हणून चीन व जपान ह्या देशांच्या दरम्यान खाजगी पातळीवर मालाची ऐनजिनसी अदलाबदल करण्याच्या स्वरूपाचा व्यापार सुरू होण्याची शक्यता उत्पन्न झाली आहे. उभयता देशांमधील व्यापार वाढविण्यासाठी दीर्घ मुदतीनें म्हणजे सुमारें ५ वर्षे चालूं राहणारे करारमदार फाजगी व्यापारी संघटनांत करण्यांत येतील अशी वार्ता आहे. जपान चीनला खतें, शेतीसाठी उपयुक्त असणारीं रसायनें, शेतीचीं अवजारें, पोलाद, रासायनिक कारखान्यांची यंत्रसामग्री, इत्यादि माल पुरविणार असून ह्या मालाच्या बदला चीनकडून मीठ, कोळसा; लोखंडाचें खनिज, सोयाबीन्स व औषधी वनस्पति आयात करणार आहे. चीनमध्यें गेल्या तीन-चार वर्षांत अन्नधान्याची टंचाई उत्पन्न झाल्याच्या बातम्या येत आहेत. चीन जपानकडून जो माल घेणार आहे त्यांत शेतीविषयक विकासाला लागणाऱ्या मालाला विशेष प्राधान्य देण्यांत आलेलें आहे. ह्यावरून चीनमधील अन्नधान्याच्या तुटवड्याच्या वार्तांना अप्रत्यक्षरीत्या पाठिंबाच मिळत आहे. जपान चीनडून जो माल घेणार आहे त्यांत मीठ आणि लोखंडाचें खनिज ह्यांचा समावेश आहे. ह्या दोन पदार्थांची निर्यात भारत जपानला करीत असल्यानें भारताच्या निर्यातीवर चीन व जपान ह्यांच्या दरम्यान होणाऱ्या व्यापाराचा परिणाम होण्याची शक्यता नजरेआड करून चालणार नाहीं. जपान चीनकडून दरसाल सुमारें १० लाख टन मीठ आयात करीत असे. जपानला लागणाऱ्या मिठापैकीं ही आयात निम्मी आहे. पण १९५८ सालीं चीननें जपानशीं असलेलें सर्व व्यापारी संबंध तोडून टाकले.

त्यानंतर जपाननें आपली मिठाची गरज मुख्यत: तैवान, सयाम आणि भारत ह्या देशांच्याकडून भागविण्यास सुरवात केली. चालू वर्षाच्या प्रारंभीं जपाननें भारताच्या स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनशीं दोन वर्षे मुदतीचा करार करून ह्या कालावधींत ५ लाख टन मीठ आयात करण्याचें ठरविलें. सध्यां भारत जपानला जितकें मीठ पुरवीत आहे तितकें मीठ पुढेंहि पुरविणें शक्य आहे. परंतु जपाननें चीनकडून मीठ आयात करण्यास पुन्हा प्रारंभ केल्यावर भारताच्या मिठाच्या निर्यातीवर त्याचा परिणाम होण्याचा संभव आहे. मिठाच्या किंमतींत वहातुकीच्या खर्चाचा भाग बराचा मोठा असतो. अर्थातच, सयाम अगर भारतासारख्या दूरच्या देशांकडून मिठाची आयात करण्यापेक्षा ती जवळच असलेल्या चीनकडून करणें जपानच्या दृष्टीनें अधिक फायद्याचे आहे. तथापि जपाननें मिठाच्या पुरवठ्यासंबंधीं चीनखेरीज इतर देशांशीं कांहीं करारमदार केलेले आहेत. त्यामुळें. जपान चीनकडून फार मोठ्या प्रमाणावर मिठाची आयात एकदम करूं लागेल अशी फारशी शक्यता दिसत नाहीं. शिवाय, चीन वाहतुकीच्या खर्चासकट जी किंमत जपानला सांगत आहे ती भारताच्या मिठाच्या किंमतीपेक्षा जवळजवळ दुप्पट आहे असें म्हणतात. ह्या सर्व परिस्थितीचा विचार करतां जपान चीनकडून सध्यां तरी दोन ते अडीच लाख टन मिठापेक्षा अधिक मीठ आयात करील असें वाटत नाहीं. इतक्या मिठाच्या बदला चीन जपानकडून एक लाख ते दीड लाख टन अमोनियम क्लोराईड घेऊं इच्छित आहे.

चीनकडून जपान लोखंडाचें खनिज किती प्रमाणांत घेऊं शकेल हा प्रश्नच आहे. कारण, चीनच्या लोखंडाच्या खाणी त्याच्या किनाऱ्यावरील बंदरापासून बऱ्याच दूर आहेत. त्यामुळें लांब अंतरावरून खुष्कीच्या मार्गानें बंदरांत आणलेलें लोखंडाचें खनिज किंमतींत महाग पडणार आहे. जपानला असलीं महाग खनिजें घेणें कितपत परवडेल ह्याविषयीं शंकाच आहे. यांगत्सी नदीवरील हँकौ शहराच्या जवळ असलेल्या एका खाणींतील खनिज मात्र जपानला पुरविणें सुलभ आहे. कारण ह्या नदीच्या पात्रांतून खनिजाची जलवहातूक करणें शक्य आहे. ह्या नदीमधील खनिजांतील लोखंडाचे प्रमाण ५६ ते ६० टक्क्यापर्यंत आहे. हैनान बेटांमधील लोखंडाचें खनिजहि जपानला सहज पुरवितां येण्यासारखें आहे. कारण, वहातूक समुद्रामार्गे करून लोखंडाचें खनिज सरळ जपानच्या बंदरांतून उतरवितां येईल. चीनमधील लोखंडाच्या खाणींचा विकास करण्यासाठी जपान आपले तांत्रिक तज्ज्ञ पाठविण्याची तयारी दाखवील असा संभव आहे, चीननें तंत्रज्ज्ञांची मदत घेतली तर चीनच्या लोखंडाच्या खनिजांची उत्पादनाची किंमत बरीच कमी करतां येईल आणि मग चीनकडून मोठ्या प्रमाणावर लोखंडाच्या खनिजाची आयात करणें जपानला शक्य होईल. परंतु चीन, जपानी तंत्रज्ज्ञांना आपल्या देशांत येऊं देण्याची शक्यता फारच कमी आहे. त्यामुळें चीनकडून जपान दरसाल २० लाख टनांपेक्षा अधिक अशुद्ध लोखंड घेऊं शकणार नाहीं असा अंदाज आहे. १९५८ सालापूर्वी म्हणजे जपानबरोबरचे व्यापारी संबंध तोडण्यापूर्वीं, चीननें जपानला १९५६ सालीं १,००,००० टन अशुद्ध लोखंड पुरविलें होतें. चीनच्या निर्यातीचा हा उच्चांक आहे.

---

### चितूर सहकारी साखर कारखाना

चितूर शहराजवळ चितूर सहकारी कारखान्याची उभारणी करण्यांत आली आहे. ह्या जिल्ह्यांतील हें सर्वांत मोठें औद्योगिक केंद्र असून तें उभारण्यासाठी १.३५ कोटी रुपये भांडवल लागलें आहे. कारखान्याचा विस्तार ८० एकर जागेवर पसरलेला आहे. ह्या भागांत ऊंस हें एक महत्त्वाचें व्यापारी पीक असल्यामुळें उसाच्या शेतकऱ्यांनीं कारखाना काढण्याच्या कामीं बरीच आस्था दाखविली आहे. तथापि कारखाना उभारण्यासाठी लागणारी यंत्रसामग्री देशाच्या निरनिराळ्या भागांतून एकत्र करावी लागत असल्यामुळें उभारणीला नेहमींपेक्षा अधिक वेळ लागला. कारखान्याच्या एकूण भांडवलापैकी १५ लाख रुपये भांडवल उसाच्या शेतकऱ्यांनीं जमविलें; २५ लाख रुपये भांडवल राज्य सरकारनें घातलें; मध्यवर्ती इंडस्ट्रियल फायनान्स कॉर्पोरेशननें ७५ लाख रुपयांचें कर्ज दिलें; आणि आयुर्विमा कॉर्पोरेशननें २५ लाख रुपयांचें कर्ज दिलें. साखर कारखाना निघणार असें म्हटल्याबरोबर ह्या भागांतील उसाच्या लागवडींत झपाट्यानें भर पडत आहे. कारखान्याचा विचार जाहीर होण्यापूर्वीं १२,००० एकर जमिनींत उसाची लागवड करण्यांत येत असे. आता २१,००० एकर जमिनींत ऊंस लावण्यांत येत असून त्यापैकी १०,००० एकर लागवड चितूर जिल्ह्यांत आहे. चितूर जिल्ह्यांतील उसाचे शेतकरी बहुश: गूळ करीत असत. परंतु गेल्या ५-६ वर्षांत गुळाचे भाव पडलेले असल्यानें त्यांचें अतोनात नुकसान झालें. ह्या परिस्थितींतून मार्ग काढण्यासाठी सहकारी साखर कारखाना काढण्याची कल्पना निघाली व ती अमलांत आणण्यांत आली.

---

# अर्थ

बुधवार, ता. १९ डिसेंबर, १९६२



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## भारत-चीन युद्धासंबंधीं रशियाची भूमिका

भारताच्या उत्तर सरहद्दीसंबंधीं चीनबरोबर चाललेल्या वादांत चीननें २० ऑक्टोबरला मोठ्या प्रमाणावर युद्ध सुरू केलें आणि तितक्याच अनपेक्षित रीतीनें एक महिन्यानें एकतर्फी युद्धबंदी जाहीर केली. ह्या दोन मोठ्या आशियायी देशांत उद्‌भवलेल्या लष्करी संघर्षात रशियाची भूमिका काय आहे ह्यासंबंधीं देशांत चर्चा चालू आहे. संघर्षाचा वणवा पेटण्यापूर्वींच भारताला मिग २१ जातीचीं अत्याधुनिक लढाऊ विमानें देण्याचा करार उभयता देशांत झालेला होता. कराराला अनुसरून रशिया हीं विमानें तयार करण्याचा एक कारखानाच भारतात उभारून देणार आहे. त्यामुळें ह्या विमानांना लागणाऱ्या सुट्या भागांचा प्रश्नहि सुटणार आहे. भारत-चीन संघर्ष सुरू झाल्यापासून 'मिग' विमानांच्या पुरवठ्याचा प्रश्न मामुली आर्थिक मदतीच्या क्षेत्राबाहेर जाऊन राजकीय प्रचाराच्या क्षेत्रांत प्रविष्ट झाला आहे. मास्कोमधील अधिकृत गोटांतील माहितीप्रमाणें रशिया विमानें पुरविण्याच्या बाबतींत चालढकल करीत आहे ही गोष्ट खरी नाहीं. उलट, ठरलेल्या वेळापत्रकाप्रमाणें रशिया विमानांचा पुरवठा भारताला जरूर करणार आहे. चालू महिन्यांत रशिया भारताला ४ मिग विमानें देणार असून आणखी दोन अगर तीन विमानें वसंत ऋतूंत देणार आहे. रशियाकडून मिळावयाची इतर आर्थिक मदत ठरल्याप्रमाणें येत आहे असें भारत-सरकारच्या प्रवक्त्यानें कांहीं दिवसांपूर्वी जाहीर केलेलें आहे. ह्या मदतींत कांहीं लष्करी स्वरूपाच्या मदतीचाहि अंतर्भाव आहे. चीननें भारतावर केलेलें आक्रमण रशियाला पसंत नसल्याचें कांहीं वार्तावरून दिसून येतें. परंतु लढाऊ जेटविमानांचा पुरवठा रशियाकडून न झाल्यास रशियाची नापसंति कुचकामाची वाटल्यास नवल नाहीं.

---

## खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांना पूर्ण वाव द्या

इंडियन मर्चंट्स् चेंबर ह्या संघटनेची तिसरी तिमाही सभा मुंबई येथें संघटनेचे अध्यक्ष श्री. पी. व्ही. गांधी ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. ह्या प्रसंगीं बोलतांना श्री. गांधी ह्यांनीं चीनच्या भारतावरील आक्रमणामुळें उत्पन्न झालेली परिस्थिति आणि देशांतील उद्योगधंदे ह्यामधील संबंधांविषयीं आपले विचार व्यक्त केले. ते म्हणाले कीं, भारतावरील चीनच्या हल्ल्याला तोंड देण्यासाठीं संरक्षणकार्याला उपयोगी पडणाऱ्या वस्तूंचें वाढत्या प्रमाणावर उत्पादन झालें पाहिजे ही गोष्ट उघड आहे. अशा वेळीं खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांना संरक्षणासाठीं लागणाऱ्या सर्व वस्तूंच्या उत्पादनाबाबत पूर्ण वाव देण्यांत आला पाहिजे. भारतांत सध्यां सार्वजनिक मालकीचा व खाजगी मालकीचा असे विभाग असले तरी चालू आणीबाणीच्या परिस्थितींत संरक्षण कार्यासाठीं लागणाऱ्या वस्तूंच्या उत्पादनाबाबत हा भेदभाव चालू देतां कामा नये. राजकीय मतप्रणालीवर आधारलेला हा भेद संरक्षणासाठीं उत्पादनाची कमाल करण्याच्या आड येणारा आहे. सद्यःपरिस्थितींत व्यापाऱ्यांनीं व उद्योगधंदेवाल्यांनीं आपलें काम चोखपणें बजावलें पाहिजे. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेची युद्धजन्य परिस्थितीशीं सांगड घालावी लागणार आहे. योजनेची पुनर्घटना करावी लागली तरी ती पार पाडणें अतिशय जरूरीचें आहे. इतकेंच काय, पण योजनेंत ठरविण्यांत आलेल्या उद्दिष्टांची मजल गाठून अतिशय जरुरीच्या वस्तू उत्पन्न करण्यासाठी आणखीहि पुढचा टप्पा ओलांडण्याची गरज आहे. म्हणून उद्योगधंद्यांनीं उत्पादन वाढवून आपली उत्पादनक्षमता जास्तींत जास्त प्रमाणांत वापरली पाहिजे.

---

## विजेची औद्योगिक शक्ति वाढविण्याचे प्रयत्न

भारताच्या औद्योगीकरणाची वाटचाल झपाट्यानें होण्यासाठी औद्योगिक शक्तीची गरज भागविणें अगत्याचें आहे. १९६२-६३ सालांत ७,३०,००० किलोवॅट विजेची औद्योगिक शक्ति निर्माण करण्याचें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें आहे. मध्यवर्ती सरकारचें पाणीपुरवठा व औद्योगिक-शक्ति खातें ठरलेल्या उद्दिष्टापेक्षाहि अधिक औद्योगिक शक्ति उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न करीत आहे. औद्योगिक शक्तीच्या उत्पादनांत किती वाढ करावयाची तें अद्याप निश्चित करण्यांत आलेलें नाहीं. कारण, ह्या कामीं लागणारा पैसा मिळण्यावर अखेरचा निर्णय अवलंबून आहे. तथापि जरूर तो पैसा मिळवून आणखी १ लाख किलोवॅट वीज निर्माण करण्याचे प्रयत्न करण्यांत येत आहेत. भारतांत अनेक ठिकाणीं विजेची शक्ति निर्माण करण्याच्या योजना हातीं घेण्यांत आलेल्या आहेत. ह्या योजनांची प्रगति कशी काय होत आहे ह्यावर नजर ठेवण्यांत येत असून त्यांना लागणाऱ्या सामानसुमानाचा पुरवठा करण्याची दक्षता घेण्यांत येत आहे. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत रशिआकडून १५ लाख किलोवॅट वीज उत्पन्न करूं शकणारी यंत्रसामग्री निश्चितपणें मिळणार आहे. रशिआनें एकूण १८ लाख किलोवॅट वीज निर्माण करूं शकणारी यंत्रसामग्री देण्याचें कबूल केलें आहे. रशिआकडून एकूण १९ वीज उत्पादक यंत्रें यावयाचीं आहेत. त्यांपैकी १४ मिळण्याची व्यवस्था आतां झाली आहे. चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस कांहीं वीज-उत्पादन केंद्रें उभारण्यांत यावयाचीं आहेत. त्यांपैकीं कांहीं चौथ्या योजनेच्या पहिल्या दोन वर्षांतच पुरी करण्याचें घाटत आहे.

---

## पाकिस्तानची भीति व्यर्थ आहे

भारतावर चीननें केलेल्या आक्रमणाला तोंड देण्यासाठी अमेरिकेनें तांतडीची लष्करी मदत दिली. ह्या मदतीमुळें पाकिस्तानला भारतापासून धोका उत्पन्न झाल्याचा प्रचार पाकिस्तान करीत आहे. १९५४ सालीं पाकिस्तान व अमेरिका ह्यांच्यांत परस्पर संरक्षणाचा करार झाला. तेव्हांपासून पाकिस्तानला अमेरिकेकडून दरसाल सरासरी ८ कोटी डॉलर्सची मदत मिळत आहे. चीनचें भारतावर आक्रमण झाल्यावर अमेरिकेनें भारताला ६० लाख डॉलर्सचीं शस्त्रास्त्रें पाठविलीं आहेत.

---

## कागदाची काटकसर करणेचे कांहीं प्रकार

युद्धामुळें कागद फार दुर्मिळ होत चालला आहे, तेव्हां कागद शक्य तेवढ्या काटकसरीनें उपयोगांत आणावा आणि त्याची कशा तऱ्हेनें काटकसर करतां येईल हें पुढें निर्देशण्यांत आलें आहे.

(१) प्रत्येक कामाचे वेळीं शक्य तेवढा लहानांत लहान आकाराचा कागद वापरणेचे ठरवा.

(२) टाइप करणें अगर हातानें लिहिणें, कागदाचे दोन्ही बाजूनें लिहा.

(३) जरूर नसेल अशा वेळीं ऑफिस कॉपी ठेवूं नका.

(४) जास्त प्रती लिहितांना अगर टाइप करतांना तेवढ्या सर्व प्रतींची जरूरी आहे अगर कसें तें अगोदर नीट पाहून मगच त्याचेकरतां कागद खर्च करा.

(५) टाइप करणें तें सिंगल स्पेसनें टाइप करा.

(६) छपाई अगर हातानें लिहिणेचे सर्व कामांत मार्जिनचें (समास) प्रमाण शक्यतों कमी करा.

(७) छपाई कामास शक्य तेवढा लहान टाइप वापरून जागेची बचत करा.

(८) एकेरी जिन्नस पॅक न करतां १०-५ अशा जिनसा एके ठिकाणीं गुंडाळून पाहा.

(९) पॅकिंगमध्यें अगदीं आवश्यक तेवढ्या आकाराचा कागद वापरा; त्यापेक्षा मोठा वापरूं नका.

(१०) तयार मालावरील लेबलांचा साइज कमी करतां येईल तेवढा करा.

(११) तुम्हांस आलेले पत्राचे मागेंच त्याचे उत्तराची ऑफिस कॉपी लिहा व अशा तऱ्हेनें तो कागद वांचवा.

(१२) विशेष वाईट न दिसेल अशा वेळीं वेष्टणाशिवाय माल न्या.

(१३) मासिकें, साप्ताहिकें, दैनिकांचे अंक, वगैरे विक्री होईल ती होईल, बाकीच्या प्रती परत, या पद्धतीवर व्यवहार करूं नका.

(१४) भिंतीवर वगैरे लावले जाणारें एकाच जाहिरातीचें २ बोर्डांतील अंतर २०० फुटांपेक्षा कमी ठेवूं नका.

(१५) चालू परिस्थितींत शक्य तों मोफत वांटणेकरतां कॅलेंडर्स काढूं नका; त्यांतूनहि काढलींच तर तीं फारच अल्प प्रमाणावर काढा.

(१६) शाळाखात्याचे शिक्षणक्रमांत ज्यामुळें आज नवीन पुस्तकें छापणें जरूरीचें होईल असा कोणताहि प्रकारचा फरक चालू युद्धजन्य परिस्थितींत केला जाऊं नये अशी दक्षता घ्या.

(१७) छापखान्यांतून प्रुफाकरतां वापरला जाणारा कागद पूर्वींप्रमाणें एक बाजूचे ऐवजीं दोन बाजूनें उपयोगांत आणा व त्या कागदाची लांबी-रुंदी ही जरूर तेवढीच ठेवा.

(१८) सर्व ऑफिसेसमधून सरकारी अगर खासगी लहान-मोठीं पाकिटें पुन्हां पुन्हां वर पाठकोरा कागद लावून उपयोगांत आणलीं जावींत.

## हिंदुस्थान मोटार्स कंपनीला कर्ज

उद्योगपति श्री. बी. एम. बिर्ला सध्यां अमेरिकेच्या दौऱ्यावर आहेत. त्यांनीं अमेरिकेचे सेक्रेटरी ऑफ स्टेट डीन रस्क ह्यांची भेट घेतली. नंतर त्यांनीं जागतिक बँकेच्या प्रतिनिधींशींहि बोलणीं केलीं. ह्या भेटीगांठींतून हिंदुस्थान मोटार्स ह्या भारतीय कंपनीला कर्ज मिळविण्याच्या कामांत त्यांना यश आलें. हिंदुस्थान मोटार्स कंपनीला १५८ कोटी डॉलर्स कर्ज अमेरिकेनें मंजूर केलें आहे.

## अमेरिकेकडून लांब धाग्याचा कापूस मिळणार

भारत आणि अमेरिका ह्यांच्या दरम्यान लांब धाग्याचा कापूस पुरविण्यासाठी एक करार करण्यांत आला आहे. अमेरिकेच्या पब्लिक-लॉ ४८० प्रमाणें हा करार करण्यांत आला असून त्यांतील शर्तींप्रमाणें अमेरिका भारताला ३·७५ लाख गांसड्या लांब धाग्याचा कापूस पुरविणार आहे. ह्या कापसाची किंमत सुमारें २२·१९ कोटी रुपये होईल. चालू वर्षीं अशा प्रकारच्या कापसाची भारतांत टंचाई असल्यामुळें कापडाच्या गिरण्यांना बिकट परिस्थितीला तोंड द्यावें लागण्याचा संभव उत्पन्न झाला होता. परंतु, आतां कापसाच्या पुरवठ्याची निश्चिती झाल्यामुळें गिरण्यांना आपलें उत्पादन समाधानकारक पातळीवर राखतां येणें शक्य होणार आहे. कापडाच्या गिरण्यांना लांब धाग्याच्या कापसाची टंचाई कमीअधिक प्रमाणांत नेहमींच भासत असते. त्यामुळें त्याच्या आयातीची व्यवस्था करणें जरूर होतें. परंतु परदेशांतून कापूस आयात करण्यासाठीं परदेशीय चलनाची गरज असल्यानें आयात सावधानतेनें करावी लागते. गेल्या मे महिन्यांत अशा प्रकारचा एक आयातीचा करार अमेरिकेबरोबर करण्यांत आला आहे. त्या कराराप्रमाणें अमेरिका भारताला १,८०,००० गांसड्या लांब धाग्याचा कापूस देणार आहे. कापसाच्या पुरवठ्यासंबंधीं भारतानें अमेरिकेशीं केलेला हा सातवा करार आहे. भारताचें चीनशीं युद्ध सुरू झाल्यापासून देशांत आणीबाणीची परिस्थिति निर्माण झालेली आहे. आधुनिक युद्धाचें सर्वगामी स्वरूप लक्षांत घेतां अर्थव्यवस्थेचीं व उत्पादनाचीं चक्रें एकसारखी सुलभतेनें फिरत राहण्यास फार महत्त्व आहे. त्या दृष्टीनें अमेरिकेकडून होणारा कापूस-पुरवठा युद्धप्रयत्नांचा भागच ठरेल.


दूरध्वनि : २२८८०. तार : सेंको बँक

# पुणें सेंट्रल

## को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, पुणें

लक्ष्मी पथ-पुणें शहर.

**व्याजाचे नवीन आकर्षक दर-**

| | |
|---|---|
| चालू ठेव ... ... | १/४ टक्के |
| सेव्हिंग्ज ... ... | २ टक्के |

**कायम ठेव-**

| | |
|---|---|
| १ महिना ... ... | ३·३७ टक्के |
| ३ महिने ... ... | ३·५० टक्के |
| ६ महिने ... ... | ३·७५ टक्के |
| १ वर्ष ... ... | ४ टक्के |
| २ वर्षें ... ... | ४·२५ टक्के |
| ३ वर्षांचे वर ... ... | ४·५० टक्के |

**याशिवाय भक्कम सुरक्षित ठेवघरें.**

*आमच्या बँकेच्या कोणत्याहि शाखेस भेट द्या.*

*सर्व माहिती आनंदानें पुरवूं.*

वा. ग. अळतेकर,
बी. कॉम.
कार्यकारी संचालक.

## चिनी सेनादलाच्या रणांगणांवरील युक्त्या

ता. २० ऑक्टोबर ह्या दिवशीं प्रबळ व मोठ्या चिनी सैन्यानें भारताच्या लडाख व नेफा सरहद्दीवरील लष्करावर अकस्मात् हल्ला चढविला त्यामुळें भारतीय लष्कराला आघाडीवरील कांहीं लष्करी ठाणीं सोडावीं लागणें साहजिक होतें. परंतु नंतर सुमारें एक महिन्यानें चिनी लष्करानें नेफांतील से ला खिंडीवर चढवलेला हल्ला अचानक आलेला नव्हता. असें असतांना भारतीय लष्कराला ही खिंड घाईघाईनें कां सोडावी लागली असा प्रश्न उत्पन्न होतो. से ला खिंडीच्या आसपास कोंडले गेलेले भारतीय जवान जसजसे परत येत आहेत तसतशी से ला खिंडीपासून घेतलेल्या माघारीवर अधिक प्रकाश पडत आहे. से ला खिंडीवरील भारतीय लष्कराच्या ठाण्यावर चिनी लष्करानें समोरासमोर हल्ला चढविला असला तरी चिनी सेनानींची मुख्य मदार खिंडीच्या मागें जाऊन भारतीय लष्कराचा पुरवठा तोडणावर होती. हें काम करण्यासाठी चिनी सैनिकांनीं लामांच्या वेषाची बतावणी केली; त्याचप्रमाणें भारतीय सैनिकांचे गणवेष अंगावर घालून भारतीय सैनिकांना बेसावध गाठण्याचेहि प्रयत्न त्यांनीं केले. स्थानिक मोनपा वाटाड्यांना जरब दाखवून खिंडीच्या मागें जाणारे गुप्त रस्ते माहीत करून घेतले. गनिमी काव्यांत तरबेज असणाऱ्या ह्या चिनी सैनिकांजवळ ओझें असें फारसें नव्हतेंच हत्यारें व त्यांना लागणारा दारूगोळा येवढेंच सामान ते आंगावर वागवीत. त्यामुळें त्यांची वाटचाल दूरवर होऊ शकली. सैनिकांना लागणारें इतर सामानसुमान खेचरावरून व हमालांच्या डोक्यावरून मागाहून आणण्यांत येई. चिनी सैनिकांना हिंदी व तामीळ भाषेंतील 'मत मारो' सारख्या घोषणा करता येत होत्या. ह्या घोषणांमुळें कांहीं हिंदी सैनिक फसले असण्याचाहि संभव आहे.

---

## मद्रास राज्यांत दगडी कोळशाचा आढळ

मद्रास राज्याचें औद्योगीकरण करण्याच्या कामीं औद्योगिक इंधनाचा तुटवडा हा मोठा अडथळा असल्याचें सांगण्यांत येतें. जलविद्युत् निर्माण करण्यास त्या राज्यांत आतां फारसा वाव राहिलेला नाहीं असें म्हणतात. म्हणूनच, अणुशक्तीच्या साह्यानें वीज निर्माण करण्याचें आणखी एक केंद्र मद्रासजवळ उभारण्याचा निर्णय घेण्यांत आला आहे. मद्रास राज्यांत कोळशाच्या खाणी सांपडू शकतील काय, ह्यासंबंधीं भारत सरकारचें भूगर्भ खातें शोध करीत होतें. मद्रास राज्यांतील कांचीपुरम् तालुक्यांत आणि वलाजाबाद् विभागांत भूगर्भशास्त्रज्ञांना कोळशाचा सांठा सांपडल्याच्या बातम्या आल्या आहेत. कोळशाची प्रत चांगली असून संबंधित प्रदेशांत मोठ्या प्रमाणावर खनन करण्याचें घाटत आहे. ह्या भूमिगत कोळशाचा शोधहि कांहींसा अचानकच लागला. मद्रास राज्यांतील शेती व सार्वजनिक बांधकाम खात्यातर्फे पाण्यासाठी खोदकाम चालू होतें. तें चालू असतांना सुमारें १५० फूट खोलीवर दगडी कोळशाचे थर असल्याचें आढळून आलें. तथापि ह्या खोलीवरचे थर फारसे जाड मात्र नाहींत. जों जों खोल खणत जावें तों तों कोळशाची प्रत सुधारत जात असल्याचेंहि आढळून आलें आहे. मद्रास राज्यांतील ह्या कोळशाच्या खाणी अगदीं नव्यानेंच उजेडांत आल्या असें मात्र नाहीं. १८५० सालीं ह्या भूप्रदेशांत कोळशासाठी खनन झाल्याचा पुरावा उपलब्ध आहे. पण त्याची प्रत अव्वल दर्जाची नसल्यानें तें बंद करण्यांत आलें. मद्रास राज्यांत सालेम येथें पोलादाचा कारखाना काढण्यांत येत आहे. कोळशाच्या सांठ्याच्या ह्या नव्या शोधामुळें कारखाना स्थापन होण्याची तारीख अधिक जवळ आणण्यास मदत होईल.

## जपानी पद्धतीच्या भातशेतीचा प्रसार

अन्नधान्याची नेहमींच भासणारी टंचाई दूर करण्याच्या दृष्टीनें भारतांत सरकारनें व जनतेनें प्रयत्न चालविले आहेत. ह्या प्रयत्नांत जपानी पद्धतीच्या भातशेतीच्या प्रसारास महत्त्वाचें स्थान अ[illegible]. तथापि ह्या पद्धतीचा प्रसार जितका वेगानें व्हावयास पाहिजे तितका तो अजूनहि झालेला नाहीं. जपाननें भातशेतीचें दर एकरीं उत्पादन वाढविण्याच्या कामीं लक्षांत भरण्यासारखी प्रगति केलेली आहे. जपानच्या भातशेतीबाबतचा अनुभव भारतांत कारण लावतां येण्यासारखा असून त्यासाठी प्रत्येक जिल्ह्यांत एखादें नमुनेदार भाताचें शेत स्थापन करण्यांत यावें असें सुचविण्यांत येत आहे. हिंदी शेतकऱ्याची जपानी पद्धतीच्या भातशेतीविषयीं खात्री करून देण्यांत आली तर उत्पादन तिपटीनें वाढण्याची शक्यता आहे. ह्या बाबतींत उत्तर प्रदेशांतील सहराणपूरनजीक करण्यांत आलेल्या जपानी पद्धतीच्या भातशेतीच्या केंद्राचें उदाहरण डोळ्यांसमोर ठेवणें आवश्यक आहे. हें केंद्र विस्तारानें ३॥ एकरांचें आहे आणि त्यावर जपानमधून मुद्दाम मागून घेतलेले ४ शेतकरी काम करीत आहेत. गेलीं दोन वर्षें ह्या शेतावर ते राबत असून त्यांनीं भाताचें दर एकरीं पीक १५ मणांपासून ५२ मणापर्यंत वाढवून दाखविलें आहे. पाण्याचा योग्य उपयोग, सेंद्रिय व निरिंद्रिय खतांचा आणि छोट्या यंत्रांचा वापर, ह्यांच्या साह्यानें त्यांनीं उत्पादन वाढवून दाखविलें आहे. भारतांतील ग्रामीण भागांत मनुष्यबळ हवें तेवढें उपलब्ध असल्यानें भातशेतीवर यंत्राचा उपयोग केला नाहीं तरी चालण्यासारखें आहे. जपानमध्यें मनुष्यबळाचा तुटवडा असल्यानें जपानी शेतकरी यंत्रें वापरतो.

---

## आसाममधील चहाची वाहतूक

आसाममधील चहाच्या मळ्यांत होणारा चहा कलकत्ता येथें आणण्याचें काम जॉइंट स्टीमर कंपनीच्या बोटींमार्फत होत असतें. परंतु ह्या कंपनींतील पाकिस्तानी खलाशांनीं संप केल्यामुळें गेले कांहीं आठवडे चहाची वाहतूक बंद झाली होती. आतां संप मिटला असल्यामुळें पूर्व पाकिस्तानमधील जलमार्गानें कलकत्त्यांत पूर्वीप्रमाणें चहा येऊ लागला आहे. चहा हा पदार्थ निर्यात करून भारताला परदेशीय चलनाची प्राप्ति फार मोठ्या प्रमाणावर होत असते. संपामुळें भारताच्या अर्थव्यवस्थेला चांगलाच धक्का बसला होता. कलकत्त्यामधील व्यापारी सीलोन व इंडोनेशिआकडून चहा मागविण्याचा विचार करू लागले होते. निर्यात व्यापारांत महत्त्वाचें स्थान असलेल्या आसामच्या चहाची वाहतूक रस्त्यानें करण्याची योजना आंखण्यांत आली आहे.

---

## कोळशाच्या खोल खाणींसाठी यंत्रसामग्री

राष्ट्रीय कोळसा विकास कॉर्पोरेशन व पोलंड ह्यांच्या दरम्यान कोळशाच्या खोल खाणी खोदण्यासाठी लागणारी यंत्रसामग्री पुरविण्याचा करार करण्यांत आला आहे. पोलंड व भारत ह्यांनीं १९६० मध्यें आर्थिक सहकार्याचा करार केलेला आहे. करारा-प्रमाणें पोलंड भारताला २४·३ कोटी रुपयांचें कर्ज देणार आहे. ह्या कर्जाचा उपयोग करून भारत ५० ते ६० लाख रुपये किंमतीची खाणीची यंत्रसामग्री आयात करणार आहे. यंत्रसामग्री हातीं येण्यास १५ महिन्यांचा अवधि लागणार आहे. दरम्यान पोलंडच्या मदतीनें खणण्यांत येणाऱ्या पहिल्या खोल खाणीच्या प्राथमिक कामास आरंभ करण्यांत आला आहे.

---

## जनता सहकारी बँक लि. सांगली

१७ डिसेंबर हा वरील बँकेचा वाढदिवस; दोन वर्षांपूर्वी, १९६० सालीं तिची स्थापना झाली. तिनें अत्यंत अल्पावधींत खूपच प्रगति केली आहे आणि प्रगतीचा वेग कायम आहे. उदाहरणार्थ, ३०-६-६२ अखेर वसूल भांडवल १,५६,३७५ रु. होतें तें ३०-९-६२ अखेर १,६८,३५० रु. वर गेलें आणि खेळत्या भांडवलाची रक्कम दोन लाखांनीं वाढून सुमारें २२३/४ लक्ष रुपयांवर गेली. दुसऱ्याच वर्षी बँकेस १५ हजार रु. नफा होऊन २% डिव्हिडंड जाहीर करण्यांत आलें. ३१-१२-६१ रोजीं ठेवी २३/४ लक्ष रुपयांच्या होत्या त्या ३०-९-६२ रोजीं १० लक्ष रुपयांवर गेल्या आहेत, ह्यावरून बँकेनें संपादन केलेल्या विश्वासाची कल्पना येईल. "बँकेचे कर्तबगार मॅनेजर श्री. एस्. एस्. पांड्याजी, उत्साही व होतकरु नोकरवर्ग व बँकेच्या व्यवहारांत हिरीरीनें लक्ष घालणारे सहकारी डायरेक्टर्स ह्यांचें अभिनंदन करणें अत्यावश्यक वाटतें." असे उद्गार चेअरमन, श्री. मल्लिकार्जुन सातप्पा कराळे ह्यांनीं काढलेले आहेत.

---

## सातारा जिल्हा को. जमीन विकास बँक लिमिटेड, कराड सांगली बँकेकडे व्यवहार वर्ग

सातारा जिल्हा सहकारी जमीन विकास बँकेनें तिचा सांगली जिल्ह्यांतील सर्व कर्ज व्यवहार नव्यानें स्थापन झालेल्या सांगली जिल्हा सहकारी जमीन विकास बँकेकडे वर्ग करणेचें ठरविलें आहे. सातारा बँकेनें सांगली जिल्ह्यांत गेल्या २६ वर्षांत सुमारें अर्धा कोट रुपयांचें कर्ज वाटलें आहे. ३०-११-१९६२ अखेर येणें कर्ज सुमारें ३६ लाख रुपयांचें आहे. ही सर्व रक्कम सांगली बँकेकडे वर्ग होणार आहे. सांगली जिल्ह्यांतील सातारा बँकेच्या सर्व सभासदांनीं यापुढें सांगली जिल्हा जमीन विकास बँकेकडे या पूर्वीच्या येणेंदेणेचा व्यवहार करावा असें ठरलें आहे. सातारा बँकेनें यापूर्वींच सांगली बँकेकडे त्या जिल्ह्यांतील तिचा नोकर-वर्ग व फर्निचर वर्ग केलेले आहे. सातारा बँकेनें सांगली बँकेस सर्वतोपरीं सहकार्य व आपुलकी दाखवून सदर व्यवहार बंधुभावानें वर्ग करणेचा हा एक आदर्श घालून दिला आहे. दोन सहकारी संस्थेंतील उत्तम सहकार्याचें हें उदाहरण आहे. सातारा बँकेनें सांगली जिल्ह्यांतील सर्व सभासदांना एक पत्र पाठवून याबाबतची मार्गदर्शनपर माहिती सविस्तरपणें कळविली आहे.

---

**इतिहासप्रसिद्ध खेड्याचें भूदान**—भारतामधील ब्रिटिश राज्याचा पाया घालणारा रॉबर्ट क्लाइव्ह ह्यानें १७५७ सालीं प्लासी येथील इतिहासप्रसिद्ध लढाईत नबाब सिराजउद्दौल्याचा पराभव केला होता. हें खेडें भूदान यज्ञांतील आहुति म्हणून देण्यांत यावें अशी इच्छा आचार्य विनोबा भावे ह्यांनीं व्यक्त केली होती. प्लासीच्या ग्रामस्थांनीं आचार्यांची इच्छा पुरी करण्याचें ठरविलें आहे.

**मद्रास राज्यांतील अणुशक्तीकेंद्र**—मद्रास राज्य सरकारनें राज्यांत अणुशक्तीवरील वीज निर्माण करण्याचें केंद्र उभारण्यांत यावें अशी मागणी भारत सरकारकडे १९५८ पासून केलेली होती. त्या मागणीला अलीकडे यश आलें असून मद्रास सरकार केंद्राच्या स्थापनेसाठी जरूर ती व्यवस्था करण्याचें काम करूं लागलें आहे. केंद्रासाठी लागणारी जागा तयार करून देण्याचें सरकारनें ठरविलें आहे.

**ट्रॅन्सफॉर्मर्सचा नवा कारखाना**—केरळ राज्यांतील औद्योगिक विभागांत अवजड ट्रॅन्सफॉर्मर्स तयार करण्याचा एक कारखाना काढण्यांत येणार आहे. कारखान्याच्या उभारणीसाठी १·१ कोटी रुपये खर्च येणार आहे. ह्या कामीं टोकिओच्या हिटाची कंपनीचें तांत्रिक व आर्थिक साह्य मिळविण्यांत आले आहे. अशा तऱ्हेचें ट्रॅन्सफॉर्मर्स सध्यां भोपाळ येथील विजेच्या यंत्रसामग्रीच्या कारखान्यांत फक्त तयार होतात.

**यांत्रिक हत्यारांचें उत्पादन**—भारताच्या संरक्षणविषयक गरजा भागविण्यासाठी यांत्रिक हत्यारांचें उत्पादन वाढविणें अतिशय निकडीचें आहे. म्हणून अशा हत्यारांचें उत्पादन करणाऱ्या कारखान्यांना खास उत्तेजन देण्यांत येत आहे. येत्या दोन-तीन महिन्यांच्या कालांत बरींच यांत्रिक हत्यारें उपलब्ध होऊ शकतील असा अंदाज आहे. ह्या बाबतींत परदेशीय चलनाची अडचण सरकार येऊ देणार नाहीं.

**भारताच्या धोरणांत बदल**—चीनमधून बाहेर पडून हाँगकाँगला येणाऱ्या चिनी निर्वासितांना संयुक्त राष्ट्र-संघटनेच्या 'निर्वासित' कमिशनरनें मदत करावी असा ठराव संघटनेच्या सर्वसाधारण सभेंत आला असता भारतानें ठरावाच्या बाजूनें मत दिलें. ह्याच विषयावरील चर्चेंत पूर्वी भारतानें तटस्थतेचें धोरण स्वीकारलें होतें. भारतावरील चीनच्या अक्रमणामुळें हा बदल झालेला असावा.


**तापीवरील नवा पूल**—भुसावळजवळ तापी नदीवर बांधण्यांत आलेला नवा पूल कोणत्याहि प्रकारचा उद्घाटन-समारंभ न करता वाहतुकीसाठी खुला करण्यांत आला. हा पूल बांधण्यासाठी २३ लाख रुपये खर्च आला. त्याची लांबी १९६० फूट आहे. पुलामुळें भुसावळ तालुक्यांतील लोकांची चांगली सोय झाली आहे. पुलाच्या खर्चापैकी १ लाख रुपये लोकांनीं स्वयंस्फूर्तीनें जमविलें होतें.

**इथिओपिआंतील भारतीयांची मदत**—इथिओपिआंतील हिंदी नागरिकांनीं भारताच्या संरक्षण निधीसाठी १५,००० पौंडांची रक्कम पाठविली आहे. दुसरा १०,००० पौंडांचा हप्ताहि पाठविण्यांत येणार आहे. आफ्रिकेंतील इतर भारतीय नागरिकांकडूनहि मदत येत आहे.

**चीनचा शस्त्रपुरवठा बंद**—रशियाच्या सल्ल्याप्रमाणें झेकोस्लोव्हाकिआंतील कारखाने चीनला युद्धोपयोगी माल पाठविण्याचे बंद करणार आहेत. मालांत विमानांचीं एंजिनें, रणगाड्यांचे भाग, स्फोटक द्रव्यें व रसायनें आणि चिलखती पोलाद, ह्यांचा समावेश आहे.

**शरावती विद्युत्-केंद्रांतील वीज**—म्हैसूर राज्यांतील शरावती विद्युत्-केंद्र १९६३ च्या अखेरीस चालू होईल असा अंदाज करण्यांत आला आहे. ह्या केंद्रांत निर्माण करण्यांत येणाऱ्या विजेपैकी ८९,००० किलोवॅट वीज गोव्याला पुरविण्यांत येणार आहे. हा पुरवठा १९६४ च्या मध्याच्या सुमारास होऊं लागेल.

**तंबाखु-चुना चघळण्याचा परिणाम**—भारतामधील पुष्कळ लोक तंबाखु व चुना ह्यांचें मिश्रण चघळतात. त्यामुळें तेथें तोंडाच्या व जिभेच्या कॅन्सरचें प्रमाण बरेंच आढळतें असा अभिप्राय जागतिक आरोग्य-संघटनेनें व्यक्त केला आहे. भारताच्या पूर्वकिनाऱ्यावर सिगारेटचें जळतें टोक तोंडाच्या बोळक्यांत धरून धूम्रपान करण्याची पद्धत आहे. त्यामुळेंहि तोंडांतील कॅन्सरचा प्रादुर्भाव होतो अशीहि माहिती देण्यांत आली आहे.



**श्री. महादेव हरी गोडबोले**

जन्म २७ मार्च, १९०५,
बालपण व शिक्षण : सांगली हायस्कूल.
महाविद्यालयीन शिक्षण : बी. ए., एलएल. बी., सांगली, पुणें व मुंबई.
व्यवसाय : वकिली, सांगली. सन १९३१ पासून.

आपला वकिलीचा व्यवसाय करीत असतांनाच सार्वजनिक कार्याची मूलत: आवड असल्यानें श्री. माधवरावांनीं सहकारी चळवळीचें क्षेत्र निवडलें व त्यांच्या कार्याला प्रारंभ इ. स. १९३५ सालीं सांगली अर्बन को-ऑप बँकेच्या स्थापनेनें झाला. अगदीं अल्पशा भांडवलावर सुरू झालेल्या या छोटेखानी बँकेचें आजचें भव्य स्वरूप तें बहुतांशीं त्यांच्याच श्रमाचें फळ आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. १९३५ पासून आजपर्यंत या बँकेच्या संचालक मंडळावर ते आहेत व अनेक वर्षें संचालक मंडळाचे "अध्यक्ष" म्हणूनहि त्यांनीं काम केलें आहे. अर्बन बँकेप्रमाणें सांगली इंडस्ट्रिअल बँकेच्या संस्थापकांपैकी ते आहेत पण दुर्दैवानें १९४८ सालच्या जळितांत सांगली इंडस्ट्रिअल बँक जळून भस्म झाल्यामुळें तिचें आज अस्तित्व दिसत नाहीं. वरील बँकांप्रमाणेंच सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेंतहि २२ वर्षें संचालक-मंडळांत त्यांनीं काय केलें आहे. सहकारी चळवळीप्रमाणेंच अन्य आर्थिक क्षेत्रांतहि त्यांनी काम केलें आहे. वेस्टर्न इंडिया लाईफ इशुरन्स कं. लि. सातारा, सांगली बँक लि. सांगली, दि युनायटेड वेस्टर्न बँक लि. सातारा, दि उगार शुगर वर्क्स लि. उगार, या संस्थांतूनहि त्यांनीं संचालक मंडळावर काम केलें आहे.

सांगलींत झालेल्या अर्बन बँकांच्या पहिल्या अधिवेशनाचा स्वागताध्यक्षाचा मानहि त्यांना मिळाला होता. मुंबई को-ऑप. बँक्स असोसिएशनच्या महाराष्ट्र विभागांतील कार्यकारी मंडळावरहि त्यांची निवड झाली आहे.

आर्थिक क्षेत्राखेरीज अन्यत्रहि त्यांचें काम पुष्कळच महत्त्वाचें आहे. सांगली संस्थानच्या काळांत सांगली स्टेट लेजिस्लेटिव्ह असेंब्लीवर उपाध्यक्ष म्हणून व विशेषत: विरोधी पक्षाचे अध्वर्यू म्हणून त्यांनीं काम केले होते. स्वातंत्र्योत्तर काळांत मुंबई विधान-परिषदेवर पदवीधर मतदारसंघातर्फे त्यांची निवड झाली होती आणि याच काळांत पार्लमेंटरी कोर्सकरितां इंग्लंड, आयर्लंड व युरोपमधून प्रवास करण्याची संधीहि त्यांना मिळाली आहे.

सांगलीच्या परिसरांतील लहानमोठ्या अनेक चळवळींना श्री. माधवरावांचा हातभार लागलेलाच आहे. सध्यांचें युग सहकारी चळवळीचें आहे. नवीन नवीन संस्था निघाल्या आहेत व निघतहि आहेत. औद्योगिक महिला सहकारी मंडळ, सांगली, असो नाहींतर श्री. गणेश को-ऑ. सोसायटी, कुरुंदवाड असो, माधवरावांचें मार्गदर्शन सर्वांना हवेंहवेंसें वाटायचेंच.

असे आमचे माधवराव सांगली शहरांत व जिल्ह्यांत सुपरिचित आहेत. पण त्यांच्या माधवराव या नांवापेक्षा "अण्णा" हें नांव अधिक लोकप्रिय आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या सांगली शाखेशीं ते १९४० मध्यें संबंधांत आले व सांगली शाखेचे १९४२ सालीं संघचालक झाले. तेव्हांपासून लहानथोर स्वयंसेवकांना अण्णांचें मार्गदर्शन लाभत आलें आहे.

आर्थिक क्षेत्राप्रमाणें राजकारणांतहि त्यांचें लक्ष असल्यामुळें भारतीय जनसंघ या राजकीय पक्षामध्यें त्यांनीं प्रवेश केला आणि सध्यांतर या पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेशाचे ते उपाध्यक्ष म्हणून काम करतात.

याप्रमाणें अनेक चळवळींतून स्वयंसेवकांपासून ते अध्यक्षा-पर्यंत काम करण्याचा अण्णांचा मित्रपरिवार प्रचंड आहे. त्यांच्या मित्रमंडळींचीं लहानमोठीं संमेलनेंहि त्यांनीं भरविलीं आहेत.

अनेक चळवळींत आणि कार्यक्रमांत मग्न असल्यामुळें त्यांच्या स्थानिक मित्रमंडळींना त्यांचा सहवास अपुरा वाटतो. वेगवेगळ्या कामांसाठी पुणें, मुंबई, नागपूर, दिल्ली, असे त्यांचे प्रवास चालू असल्यामुळें "आपले अण्णा आतां मोठे झाले" यांतच समाधान मानून त्यांच्या येथील कमी वास्तव्याची उणीव भरून काढावी लागते.

## सोन्याच्या किंमतीची घसरगुंडी तात्पुरती

सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ श्री. बी. आर. शेणॉय ह्यांनीं असें मत व्यक्त केलें आहे कीं, भारत सरकारनें सोन्याच्या किंमतीबाबत जे उपाय योजले आहेत त्यामुळें सोन्याच्या किंमतींत एकदम झालेली घट तात्पुरती ठरण्याचा संभव आहे. कारण भारतामधील चलन-वृद्धीचा सोन्याच्या किंमतीवर परिणाम झाल्याशिवाय राहाणार नाहीं. भारतावर चीननें आक्रमण केल्यानंतर सरकारनें आणी-बाणीच्या परिस्थितींत सोन्याचे रोखे काढले व सोन्याच्या वायदे-व्यवहारावर बंदी घातली. त्यामुळें सोन्याचे भाव घसरले असले तरी सोन्याची चोरटी आयात दीर्घकाळपर्यंत थांबेल असें नाहीं. सोन्याची आंतरराष्ट्रीय किंमत आणि भारतामधील किंमत ह्यांच्यां-तील तफावतीचा प्रश्न सोडविण्यासाठी सरकारनें आणखी चलन-वृद्धीला आळा घातला पाहिजे आणि 'सोन्याची अधिकृत किंमत अधिक वास्तववादी पातळीवर उंचावली पाहिजे.

## परदेशीय चलनाची बचत

लंडनमधील भारताच्या ओव्हरसीज पर्चेस ऑर्गेनायझेशन कडील कामाची पुनर्घटना करण्यांत येणार आहे, त्यामुळें दरसाल ६·७५ लाख रुपयांच्या परदेशीय चलनाची बचत होणार आहे. भारत सरकारला पाठविण्यांत येणाऱ्या मालाची वाहातूक व इतर व्यवस्था करण्यासाठी आतां एका कंपनीची नेमणूक करण्यांत आली आहे. ही कंपनी कांहीं मोबदला न घेतां काम करील. उत्तर युरोपांतून भारताला पाठविण्यांत येणाऱ्या मालाबद्दल जो वाहातूक खर्च करावा लागेल त्यावर मिळणारें कमिशनच फक्त कंपनी घेईल. भारताच्या इंडियन स्टोअर्स डिपार्टमेंटमधील नोकरांची संख्या अर्थातच कमी करण्यांत येणार आहे.

## दोन सेल्समनमधील फरक

बुटांच्या एक कारखानदारानें दोघा सेल्समनना आफ्रिकेंत मालाच्या प्रचारासाठी पाठविलें. तेथें पोंचल्यावर तीन दिवसांनीं एका सेल्समननें तार पाठवली, "पुढच्या विमानानें परत येत आहें. इथं बूट विकणं अशक्य आहे; सगळीजण अनवाणीच जातात."

दुसऱ्या सेल्समननें तीन आठवडे कांहींच कळविलें नाहीं; नंतर त्याचेकडून एअर मेलनें पत्र आलें. त्यांत लिहिलें होतें, "बुटांच्या खपाला प्रचंड वाव आहे. दीडशें बुटांच्या ऑर्डरी मिळवल्या आहेत. इथं कुणाजवळच बूट नाहींत."

## १९६०–६१ मधील सहकारी चळवळीची प्रगति

१९६०–६१ मधील सहकारी चळवळीविषयीं आकडेवार माहितीचें रिझर्व्ह बँकेचें प्रकाशन नुकतेंच हातीं आलें आहे. १९४०–४१ सालापासून रिझर्व्ह बँक असें प्रकाशन दरसाल करीत आली आहे. त्यावरून दिसून येतें, कीं सहकारी चळवळीनें आपली प्रगति अहवालाचे वर्षीहि कायम राखली आहे. १९६०-६१ आणि १९५९-६० ह्यांचे तुलनात्मक आकडे खालीं दिले आहेत:–

### कांहीं महत्त्वाचे आकडे

| | १९५९–६० | १९६०–६१ |
|---|---|---|
| सर्व प्रकारच्या सोसायट्या | ३,१३,४९९ | ३,३२,४८८ |
| त्यांचे स्वत:चे फंड | २६७ कोटी रु. | ३१७ कोटी रु. |
| खेळतें भांडवल | १०८४ कोटी रु. | १३१२ कोटी रु. |
| प्राथमिक सोसायट्यांचे सभासद | ३०३ लक्ष | ३४२ लक्ष |
| सहकारी कक्षेंतील नागरीक | १५१५ लक्ष | १७१२ लक्ष |
| त्यांचें लोकसंख्येशीं प्रमाण | ३८% | ३९% |
| केंद्रीय सहकारी बँका | २२ | २१ |
| त्यांचें खेळतें भांडवल | १७५ कोटी रु. | २२२ कोटी रु. |
| त्यांनीं दिलेलीं कर्जें | १९७ कोटी रु. | २५८ कोटी रु. |
| मध्यवर्ती बँका | ४०० | ३९० |
| त्यांनीं दिलेलीं कर्जें | २९५ कोटी रु | ३५४ कोटी रु. |
| शेतकी पतपेढ्यांनीं दिलेलीं कर्जें | १६९ कोटी रु. | २०३ कोटी रु. |
| येणें कर्जें | १७८ कोटी रु. | २१८ कोटी रु. |
| थकबाकी | २१% | २०·३% |
| बिगर-शेतकी पतपेढ्या | ११,३७१ | ११,९९५ |
| त्यांचे सभासद | ४२·३१ लक्ष | ४५·७३ लक्ष |
| त्यांचें खेळतें भांडवल | १३७ कोटी रु. | १५० कोटी रु. |
| त्यांनीं दिलेलीं कर्जें | ११७ कोटी रु. | १३० कोटी रु. |
| मध्यवर्ती लँड मार्गेज बँका | १६ | १८ |
| त्यांचें खेळतें भांडवल | ३७ कोटी रु. | ४८ कोटी रु. |
| त्यांनीं दिलेलीं कर्जें | ८·५२ कोटी रु. | ११·६२ कोटी रु. |
| प्राथमिक लँड मॉर्गेज बँका | ४०८ | ४६३ |
| त्यांचे सभासद | ५·५० लक्ष | ६·६९ लक्ष |
| सभासदांकडून येणें कर्ज | १९ कोटी रु. | २५ कोटी रु. |
| साखर कारखाने | ५७ | ६६ |
| त्यांपैकी चालू झालेलें | २६ | ६२ |
| त्यांचें खेळतें भांडवल | ४७ कोटी रु. | ६५ कोटी रु. |
| त्यांनीं गाळलेला ऊंस | २६ लक्ष टन | ४० लक्ष टन |
| तयार केलेली साखर | २·८४ लक्ष टन | ४·७५ लक्ष टन |
| साखरेची किंमत | २९ कोटी रु. | ४४ कोटी रु. |


# कण आणि क्षण

लेखक:—श्री. वा. काळे

ह्या पुस्तकाच्या तिसऱ्या आवृत्तीची छपाई पूर्ण होत आली असून पुस्तक लवकरच प्रसिद्ध होईल.

: प्रकाशक :

व्हीनस प्रकाशन,

३८१ क, शनवार पुणें २.


### राज्य सहकारी बँकांचें खेळतें भांडवल
( आकडे कोटी रुपयांचे )

| बाब | ३०–६–६० | | ३०–६–६१ | |
|---|---|---|---|---|
| | रक्कम | खेळत्या भांडवलाशीं प्रमाण % | रक्कम | खेळत्या भांडवलाशीं प्रमाण % |
| खेळतें भांडवल | १७४·७४ | | २२१·६५ | |
| स्वत:चे फंड | १९·६९ | ११·३ | २४·०० | १०·८ |
| ठेवी | ६०·१५ | ३४·४ | ७२·३३ | ३२·६ |
| कर्जें-सरकारकडून | ५·५८ | ३·४ | ६·०० | २·७ |
| रिझर्व्ह बँकेकडून | ८५·२१ | ४८·८ | ११३·८२ | ५१·४ |
| इतर मार्गें | ३·८१ | २·१ | ५·५० | २·५ |

### मध्यवर्ती सहकारी बँकांचें खेळतें भांडवल
( आकडे कोटी रुपयांचे )

| बाब | ३०–६–६० | | ३०–६–६१ | |
|---|---|---|---|---|
| | रक्कम | खेळत्या भांडवलाशीं प्रमाण % | रक्कम | खेळत्या भांडवलाशीं प्रमाण % |
| खेळतें भांडवल | २४७·४० | | ३०४·०५ | |
| स्वत:चे फंड | ४१·६९ | १६·९ | ५०·८७ | १६·७ |
| ठेवी | ९५·४१ | ३८·६ | ११२·०२ | ३६·८ |
| इतर कर्जें | ११०·३० | ४४·५ | १४१·१७ | ४६·४ |

### एकूण शेतकी पतपेढ्यांचा तपशील
( आंकडे कोटी रुपयांचे )

| बाब–( सरासरीचे आंकडे ) | १९५९-६० | १९६१-६० |
|---|---|---|
| प्रत्येक सोसायटींतील सभासद | ७१ | ८० |
| ,, ,, खेळतें भांडवल | ११,०११ | १२,९१३ |
| ,, ,, भागभांडवल | २,३१२ | २,७२२ |
| ,, सभासदामागें भागभांडवल | ३२ | ३४ |
| प्रत्येक सोसायटींतील ठेवी | ५८५ | ६८८ |
| ,, सभासदामागें ठेवी | ९ | ९ |
| प्रत्येक सभासदास कर्ज | ११७ | ११९ |

राज्य सहकारी बँकांचा नफा ११७ लक्ष रु. वरून १५१ लक्ष रु. वर गेला. नफ्यांत चालणाऱ्या मध्यवर्ती बँकांची संख्या ३४४ ची ३५६ झाली आणि त्यांचा नफा २४२ लक्ष रु. वरून ३५५ लक्ष रु. वर गेला. लहान आकाराच्या शेतकी पतपेढ्या आणि धान्य बँका ह्यांचेहि बाबतींत अशीच प्रगति दिसून येते. नफ्यांत चालणाऱ्या मोठ्या आकाराच्या शेतकी पतपेढ्यांची संख्य ६,३०३ वरून ६,१५६ वर उतरली तरी त्यांचा नफा वाढून तो १२६ लक्ष रु. चा १६२ लक्ष रु. झाला. प्राथमिक लँड मार्गेज बँकांपैकी २९१ बँका नफ्यांत आणि १०४ बँका तोट्यांत होत्या; त्यांची १९६०–६१ ची संख्या अनुक्रमें ३०५ बँका आणि १३७ बँका अशी आहे. १९६०–६१ मध्यें एकूण २,०१,३९० सोसायट्यांनीं २४·३३ कोटी रु. नफा मिळविला तर ७५,५५८ सोसायट्यांना ६ कोटी, ४२ लक्ष रु. तोटा झाला

### रणगाड्यांना लागणाऱ्या चिलखती पत्र्याचें उत्पादन

भारताचे परचक्रापासून रक्षण करण्यासाठी आधुनिक शस्त्रास्त्रांच्या निर्मितीच्या बाबतींत स्वयंपूर्ण होणें आवश्यक आहे. त्या दृष्टीनें रणगाडे तयार करण्याचा कारखाना आवडी येथें उभारण्यांत येत आहे. रणगाड्यांना लागणारा पोलादाचा चिलखती पत्रा रूरकेला येथील पोलादाच्या कारखान्यांत तयार करण्याचा विचार वर्षापूर्वींपासून चालू आहे. कांहीं महिन्यांपूर्वी भारतामधील तंत्रज्ञांची एक तुकडी अशा प्रकारच्या पोलादी पत्र्याच्या उत्पादनतंत्राचा अभ्यास करण्यासाठीं पश्चिम जर्मनीला गेली होती. ह्या तुकडीनें आपला अहवाल आतां मध्यवर्ती सरकारला सादर केला आहे. जर्मनीचे प्रसिद्ध उद्योगपति मि. क्रुप हे नुकतेंच भारतांत येऊन गेले. रुरकेला येथील छापखान्यांत चिलखती पोलाद निर्माण करण्यासाठी कांहीं नवीन यंत्रसामग्री बसवावी लागेल, असा अभिप्राय त्यांनीं व्यक्त केला आहे. खुद्द क्रुपचा जर्मनीमधील कारखाना शस्त्रास्त्रे बनवीत नसल्यानें जरूर ती यंत्रसामग्री त्या कारखान्याकडून मिळण्याचा संभव नव्हता व नाहीं. परंतु ही यंत्रसामग्रीची अडचण फारशी जाणवण्यासारखी नाहीं असें सांगण्यांत येत आहे. रुरकेला येथील कारखान्यांत अवजड व मध्यम प्रतीचे पोलादी पत्रे तयार करण्याची व्यवस्था आहेच. फक्त त्यांना जरूर तें पाणी देऊनच अधिक कठीण करण्याचाच काय तो प्रश्न आहे. तो सोडवितां येणें अशक्य नाहीं. पेकिंग रेडिओवरून सांगण्यांत येणाऱ्या वृत्तांत मि. क्रुप ह्यांच्या भारतामधील दौऱ्याला वाजवीपेक्षा अधिक महत्त्व देण्यांत आलें होतें. क्रुप व शस्त्रास्त्रें ह्यांचें समीकरण जगभर प्रसिद्ध आहे. त्यामुळें चीनच्या सरकारला चिंता वाटली असावी.

### राजदूतांच्या मोटारी विकण्यास बंदी

दिल्ली येथें अनेक परदेशीय राजदूतांच्या कचेऱ्या आहेत. हे राजदूत भारतांतून परत जातांना आपल्या मोटारी विकून टाकतात. ह्या मोटारी भरमसाठ किंमत देऊन विकत घेणारे व त्यावर पुन्हा तसाच मोठा नफा मिळविणारे लोक आहेत. परंतु आतां असें करणें शक्य होणार नाहीं. भारत सरकारनें, राजदूतांनीं आपल्या मोटारी खाजगी व्यक्तींना विकूं नयेत असा निर्बंध जारी केला आहे. गाड्या विकावयाच्याच झाल्यास त्या भारताच्या स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनला विकण्यांत याव्या अगर त्या आपआपल्या देशांना परत घेऊन जाव्या अशा सूचना राजदूतांना देण्यांत आल्या आहेत.

### युरोपीय बाजारपेठेमुळें भारताला लाभ

पश्चिम जर्मन सरकारचे स्टेट सेक्रेटरी मि. हेन्रिक फॉन हरवार्थ मद्रास येथें बोलतांना म्हणाले कीं, युरोपीय सामायिक बाजारपेठेच्या स्थापनेमुळें भारताला खूपच लाभ होणार आहे. ब्रिटननें ह्या बाजारपेठेंत सामील होणें हें ब्रिटिश लोकांच्या हिताचें तर आहेच; पण पश्चिम युरोपमधील लोक आणि जग ह्यांच्याहि दृष्टीनें हिताचें आहे. आर्थिक दृष्ट्या एकवटलेला युरोप भारताला अधिक प्रमाणांत मदत करूं शकेल. इतकी मदत ब्रिटन, फ्रान्स अगर जर्मनी अशा एकेकट्या देशांना करतां येणार नाहीं. जर्मनीला निर्यात व्यापाराविषयीं आस्था आहे. जर्मनी हा देश परदेशांशीं होणाऱ्या व्यापाऱ्यावर अवलंबून आहे. म्हणून त्यानें युरोपीय सामायिक बाजारपेठेंत सामील होणें आशिया, आफ्रिका आणि अमेरिका ह्या सर्वांच्या फायद्याचें आहे. कारण, ह्या देशांकडून जर्मनीहि माल विकत घेतो.

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय.
विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

श्री. वा. काळे यांचीं दोन नवीं पुस्तकें
१ दाणे आणि खडे किं. रु. २=५०
२ कौटुंबिक हितगुज किं. रु. ३=००

महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लिमिटेड, मुंबई
[ दि विदर्भ सहकारी बँक लि. सम्मीलित ]
: मुख्य कचेरी : ९, बेंक हाऊस लेन, फोर्ट मुंबई. टेलिफोन नं.२५५४७४–७५. ३८३१४.
: विभागीय कचेरी : महाल : नागपूर. तारेचा पत्ता : फार्मर बँक
: बृहन्मुंबईतील शाखा :
(१) भायखळा (२) गोरेगांव (३) खार (४) लालबाग
(५) प्रभादेवी (६) विलेपार्लें (७) सांताक्रूझ
(८) मुलुंड (९) चेंबूर.
चेअरमन : प्रा. ध. रा. गाडगीळ
ह्या बँकेंत गुंतविलेला पैसा शेतकरीवर्ग, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी साखर कारखाने यांच्याच उपयोगासाठीं दिला जातो.

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल | ... | ३ कोटी ८७ लाख |
| गंगाजळी व फंड | ... | १ कोटी ०५ लाख |
| ठेवी | ... | १५ कोटी ४८ लाख |
| खेळतें भांडवल | ... | ६१ कोटी ६१ लाख |

महाराष्ट्र राज्यांत सर्वत्र शाखा व संलग्न बँका आहेत.
भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें, वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

भारतातील प्रमुख नागरी सहकारी बँक
दि सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
लाख
वसूल भांडवल... रु. — ९.५८
राखीव निधी ... रु. — १०.९१
ठेवी ........ रु. —३०५.४९
खेळतें भांडवल . रु. —३३५.००
मुख्य कचेरी सारस्वत बँक गृह, गिरगांव, मुंबई-४
शाखा : फोर्ट, दादर, वरळी, वडाळा, माहिम, पुणें व बेळगांव
महिला शाखा : गिरगांव, मुंबई-४

**दुधाच्या पदार्थांचा पुरवठा**—अमेरिका आणि भारत ह्यांच्या दरम्यान दुधाच्या पदार्थांच्या पुरवठ्यासंबंधीं करार करण्यांत आला आहे. कराराप्रमाणें भारत अमेरिकेकडून सुमारें ४६ लाख डॉलर्स किंमतीचे दुधाचे पदार्थ व डबाबंद फळें विकत घेणार आहे. ह्या मालाची किंमत रुपयांत देण्यांत यावयाची आहे. माल विकून आलेल्या रकमेपैकी ८५ टक्के रकमेचा विनियोग भारतामधील विकासकार्यासाठी करण्यांत येणार आहे.

**केरळ राज्यांतील दारूबंदी**—केरळ राज्याच्या मुख्यमंत्र्यांनीं असें जाहीर केलें आहे कीं, राज्यांतील दारूबंदी रद्द करण्यांत येणार नाहीं. मात्र दारूबंदीबाबत कांहीं देशव्यापी धोरण स्वीकारण्यांत आल्यास केरळ राज्य ते अंमलांत आणील. राज्यांतील दारूबंदी रद्द करण्यांत आली तर राज्यसरकारला ४ कोटी रुपयांचें उत्पन्न होईल असा अंदाज त्यांनीं व्यक्त केला.

**पोलादाच्या कारखान्याची यंत्रसामग्री**—झेकोस्लोव्हाकियांतील स्कोडा कारखान्याच्या निर्यात विभागाचे संचालक मि. रॉटेनबॉर्न ह्यांनीं दिल्ली येथें अशी माहिती दिली, कीं झेकोस्लोव्हाकिया भारताला दरसाल १० लाख टन पोलाद निर्माण करूं शकणाऱ्या कारखान्याची यंत्रसामग्री देऊ शकेल. नंतर ह्या कारखान्याच्या उत्पादनक्षमतेचा विस्तारहि करतां येईल.

**मोटारकारखान्यांची यंत्रसामग्री देण्यास नकार**—रशिआ आणि झेकोस्लोव्हाकिया ह्या देशांकडे ४·३५ कोटी डॉलर्सची मोटारकारखान्यांची यंत्रसामग्री निर्यात करण्याची मागणी कांहीं अमेरिकन कारखानदारांनीं केली होती; परंतु अमेरिकेच्या व्यापारखात्यानें अशी परवानगी देण्याचें नाकारलें आहे. हीं यंत्रसामग्री निर्यात करण्यासंबंधीची मागणी दीर्घकाळ दप्तरीं पडून होती.

दातांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★



किर्लोस्कर ब्रदर्स लि. किर्लोस्करवाडी (द. सातारा)

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.